राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र

**(प्रसारमाध्यम विभाग)**

पुणे - ४११०३०.

(दूरध्वनी क्र. 020-24488382)

दरपत्रक

संदर्भ क्र. राशैसंप्रपम/ पुणे/ ______________

दिनांक – १५/०४/२०२१

लिपिक/ डाटा एंट्री ऑपरेटर पदांची कामे कंत्राटी पद्धतीने करणेसाठी सेवा पुरविणे

सन २०२१–२२

दरपत्रक स्वीकारण्याचा

अंतिम दिनांक – २३/०४/२०२१ रोजी ५:०० वाजेपर्यंत

## लिपिक/ डाटा एंट्री ऑपरेटर पदांची कामे कंत्राटी पद्धतीने करणेसाठी सेवा पुरविणे

## सन २०२१–२२

शासनाने विहीत केलेल्या पध्दतीनुसार प्रसारमाध्यम विभागातील लिपीक संवर्गीय पदांची कामे बाहय यंत्रणेमार्फत/ कंत्राटी पध्दतीने करुन घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| १ | दरपत्रक क्रमांक - | ०१ |
| २ | दरपत्रक तपशिल | शासनाने विहीत केलेल्या पध्दतीनुसार प्रसारमाध्यम विभागातील लिपीक संवर्गीय पदांची कामे बाहय यंत्रणेमार्फत/ कंत्राटी पध्दतीने करुन घेणे आवश्यक आहे. |
| ३ | कामाची अंदाजित रक्कम | रुपये २,८०,०००/- |
| ४ | बयाणा रक्कम | रुपये ७००० /- |
| ५ | सुरक्षा अनामत रक्कम (Bank Security Deposit) | रुपये ८५०० /- |
| ६ | कोरी दरपत्रक नमुना किंमत | रुपये १४०० /- |
| ७ | पूर्व बैठक | दिनांक २६/०४/ २०२१ |
| ८ | कोरे दरपत्रक नमुने विक्री कालावधी व वेळ | दिनांक – १९/०४/२०२१ ते २२/०४/२०२१ दुपारी ५:०० वाजेपर्यंत |
| ९ | दरपत्रक स्वीकारण्याचा कालावधी व वेळ | दिनांक – २३/०४/२०२१ दुपारी ५:०० वाजेपर्यंत |
| १० | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक- २७/०४/२०२१ दुपारी १२:०० वा. |

दरपत्रके दोन लिफाफा पद्धतीने सादर करावे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,

(प्रसारमाध्यम विभाग)

७०८, कुमठेकर रोड, सदाशिव पेठ, पुणे ३०

दूरध्वनी क्रमांक ०२०- २४४८८३८२

दरपत्रक क्रमांक -१

**कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा तांत्रिक दरपत्रका नमुना (अ)**

१. ठेकेदाराचे नाव :

२. ठेकेदार संस्थेचे पूर्ण नाव :

३. संस्थेचा पत्ता :

४. भागीदारीतील नावे :

(भागीदार संस्था असल्यास)

५. दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक :

(एस.टी.डी. कोडसह)

ईमेल आयडी

फॅक्स क्रमांक (एस.टी.डी. कोडसह)

६. स्थापनेचे वर्ष :

७. बँकेचे नाव व शाखेचे नाव आणि सर्व बँकाचे खाते क्रमांक :

८. संस्थेची विभागीय कार्यालये असल्यास त्याची माहिती :

९. ठेकेदार संस्थेने गेल्या तीन वर्षात केलेल्या कामाचा तपशील : सोबतच्या तक्ता क्र. १ मध्ये माहिती द्यावी.

१०. सध्या हाती असलेल्या कामाचा तपशील : सोबतच्या तक्ता क्र. १ मध्ये माहिती द्यावी.

११. लेबर लायसन्स नंबर :

(फक्त पुण्यातील नोंदणी)

१२. सर्टिफिकेट ऑफ रजिस्ट्रेशन ऑफ महाराष्ट्र –

कॉन्टॅक्ट लेबर (रेग्लुलेशन ॲन्ड अबोलीशन) रुल्स १९७१

१३. बॉम्बे शॉप्स ॲन्ड एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट अन्वये नोंदणी क्रमांक

१४. प्रॉव्हिडंट फंड नोंदणी क्रमांक

१५. ई.एस.आय. नोंदणी क्रमांक

१६. जीएसटी नोंदणी क्रमांक

१७. मागील तीन आर्थिक वर्षातील संस्थेची उलाढाल : वर्ष रक्कम रुपये

१८. कामाचे स्वरुप : कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा करणे

१९. कामाचे ठिकाण : प्रसारमाध्यम विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, कुमठेकर रोड, सदाशिव पेठ, पुणे ३०

२०. अंदाजित संख्या :

२१. बयाणा रक्कम (ऑनलाईन भरावी) : ७००० = ०० (अक्षरी रुपये सात हजार फक्त)

२२. दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक : पृष्ठ क्र. २ वरील वेळापत्रकानुसार

२३. दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण : प्रसारमाध्यमविभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, कुमठेकर रोड, सदाशिव पेठ, पुणे ३०

२४. दरपत्रक वैधता कालावधी :

२५. दरपत्रकाचा कालावधी : करार केल्यापासून ६ महिने (आवश्यकतेनुसार कालावधी कमी-जास्त होण्याची शक्यता)

२६. दरपत्रक सादर करावयाचे वेळापत्रक सोबत जोडले आहे.

२७. दरपत्रकासोबत जोडावयाची कागदपत्रे तांत्रिक नमुना - अ मध्ये नमूद केलेली आहेत.

२८. दरदर्शक – तक्ता ब मध्ये सेवाशुल्काचे दर नमूद करावेत.

२९. Self -Declaration नमुनापत्र जोडले आहे.

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, प्रपत्र-अ मध्ये नमूद करण्यात आलेली सर्व माहिती सत्य असून सदर माहितीमध्ये काही विसंगती आढळल्यास परिषदेच्या नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास आमची कोणतीही हरकत राहणार नाही.

| | |
|---|---|
| ठिकाण : | दरपत्रक धारकाचे नाव व स्वाक्षरी |
| दिनांक : | संस्थेचा शिक्का |

(वरील प्रमाणपत्र कंपनीने स्वतःच्या लेटरलेडवर टाईप करुन सादर करावे)

# तक्ता क्रमांक १

**मागील किमान १ वर्ष व जास्तीत जास्त ३ वर्षात यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजदारी कर्मचारी पुरवण्याच्या कामाचा संस्थानिहाय तपशील**

| अ.क्र. | कामाचे प्रकार | काम केलेल्या संस्थेचे नाव, पूर्ण पत्ता व कालावधी | पुरवलेल्या सेवकांची संख्या | | कामाचा अनुभव | | अंदाजे रक्कम (वार्षिक) रुपये | संस्थेने प्रत्यक्ष दिलेली रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सेवक | संख्या | वर्ष | महिने | | | |
| | | | | | | | | | |

टिप : संबंधित संस्थेचे काम समाधानकारकपणे पूर्ण केले असल्याबाबतची प्रमाणपत्रे सादर करावीत. वरील कागदपत्रे न केल्यास दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल.

ठिकाण : दरपत्रक धारकाचे नाव व स्वाक्षरी

दिनांक : संस्थेचा शिक्का

**महत्वाच्या सूचना :**

१. दर सर्व प्रकारच्या करांचा/दायित्वांचा (उदा.भ.नि.नि., अभिदान, वैद्यकीय विमा (ESI) इ. तथापि **सेवाकर लागू नाही**) अंतर्भाव करुन दिलेले असावेत. भविष्यात शासनाने कररचनेत बदल केल्यास त्या त्या वेळी योग्य निर्णय घेण्यात येतील.

२. दर मान्य झाल्यावर करार कालावधीत कोणतीही दरवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

३. दर अंकी व अक्षरी नमूद करावेत. अंकी व अक्षरी यात तफावत आढळल्यास अक्षरी दर विचारात घेण्यात येतील.

४. नमूद केलेले दर हे महिन्याच्या ३० दिवसांच्या मर्यादेत निश्चित करण्यात आले आहे.

५. एकूण मासिक वेतनाच्या दरावर अ.क्र. १०- मध्ये अपेक्षित असलेले सेवाशुल्क नमूद करावे.

६. ठेकेदारामार्फत नियुक्त मनुष्यबळास रविवारची १ सुट्टी देय राहील मात्र वरील दरांच्या अधीन राहून त्यांना रविवारी कामावर बोलावल्यास कामावर येणे क्रमप्राप्त राहील.

७. आयकर अधिनियमातील १९४/सी कलमानुसार वेळोवेळी जाहीर झालेल्या दराने देयकातून आयकर कपात करण्यात येईल. आर्थिक वर्षाच्या शेवटी आयकर कपातीचे एकत्रित प्रमाणपत्र देण्यात येईल.

८. मनुष्यबळाच्या मानधनातून शासन नियमाप्रमाणे व्यवसाय कराची कपात करण्यात यावी.

९. ठेकेदाराने **कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजदारी कर्मचारी पुरवठा अंतर्गत आवश्यक सेवांकरिता नेमलेल्या ठेकेदाराचे सहीने दिनांक ............ते ................ कालावधीकरिता नियुक्त करीत असल्याचे पत्र देणे आवश्यक आहे व त्या पत्राची एक प्रत कामगारास मिळाल्याबद्दल त्याचे सहीसह परिषदेस देतील. सदर करारनाम्याचा कालावधी संपल्यानंतर एजन्सीमार्फत करण्यात आलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.**

ठिकाण : दरपत्रक धारकाचे नाव व स्वाक्षरी

दिनांक : संस्थेचा शिक्का

# Annexure

# Self Declaration

1. The Vendor shall comply with all responsibilities for compliances with the provisions of all prevalent Acts, Laws, Rules, Regulation etc. The vendor shall maintain all such records and registers that are required to be maintained under various Acts and laws in respect of its self engaged in the premises of tendering Authority and shall produce the same for inspection when demanded by the tendering Authority.

2. That the agency will be wholly and exclusively responsible for payment of wages to the persons engaged by it in compliance of all the statutory obligations under all related legislations as applicable provident Funds, ESI Act etc, and the Contractor shall be not incur any liability/obligation. The agency will require to provide particular of GPF, CGEGIS of its employees engaged in the administrative charges.

3. Certified that we have gone through all the terms and conditions of the tender and agree to them. We know that the are binding on us.

4. I/we further under undertake our partner M/s……………… (Name of Vendor) having office are also not blacklisted in any Department of Government of Maharashtra.

5. I/we hereby declare that there are no pending cases against M/s………… (Name and Address of Bidder) with Government of Maharashtra or any other court of law.

Date : Signature of the bidder

Place : Name of the Firm & Seal

(वरील हमीपत्र कंपनीने स्वतःच्या लेटरलेडवर टाईप करुन सादर करावे)

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

**(प्रसारमाध्यम विभाग)**

## ७०८, कुमठेकर रोड, सदाशिव पेठ, पुणे ३०

## दूरध्वनी क्रमांक ०२०-

## दरपत्रकाबाबतच्या सूचना

ठेकेदार पध्दतीने कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारासाठी महत्वाच्या **सूचना**

१. सदरच्या ठेकेदारीची मुदत कराराच्या दिनांकापासून पुढे ११ महिने कालावधीसाठी राहील. कामाच्या गरजेनुसार या कराराची मुदत संचालक यांच्या मान्यतेने कमी -जास्त करण्यात येईल. कराराच्या कालावधीत ठेकेदाराने पुरविलेल्या कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरविणे या कामाचा दर्जा असमाधानकारक आढळल्यास मुदतीपूर्व करार संपविण्याचे अधिकार संचालक यांना राहतील.

२. मालक किंवा भागीदार संस्थेला या क्षेत्रातील किमान १ वर्षाचा अनुभव असावा.

३. वरील कामासंबंधी मागविलेले दर, आवश्यक माहिती व कागदपत्रे ज्या त्या नमुन्यात पूर्णपणे भरणे आवश्यक आहे.

४. दरपत्रक भरणाऱ्या ठेकेदाराने अर्जासोबत रक्कम रु. ७०००/- (अक्षरी रुपये सात हजार फक्त) बयाणा रक्कम डी.डी. स्वरुपात भरावी. या बयाणा रक्कमेवर परिषदेकडून कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

५. पात्र ठेकेदारास इंडियन कॉन्ट्रन्ट ॲक्टमधील तरतूदींप्रमाणे सर्व अटी व शर्तीची पूर्तता करावी लागेल.

६. ठेकेदाराने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या गरजेनुसार म्हणजेच करार झाल्यापासून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेस तातडीने रोजंदारी कर्मचारी पुरवावे लागतील, त्याने तसे न केल्यास त्यांचे सदरहू काम रद्द करण्यात येईल. तसेच संबंधित ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

७. सदर दरपत्रकांतर्गत ठेकेदाराने आवश्यक कार्यालयीन कामासाठी रोजंदारी कर्मचारी (मनुष्यबळ) उपलब्ध करुन द्यावयाचे आहे.

८. दरपत्रक उघडतेवेळी उपस्थित राहण्यासाठी, संस्थेच्या वतीने स्वाक्षरी करण्यासाठी अथवा अधिकारपत्र देण्यासाठी खाली नमूद केलेल्या व्यक्ती सक्षम राहतील.

| | |
|---|---|
| १. दुकाने व संस्था : | मालक |
| २. खाजगी कंपनी/कंपनी : | व्यवस्थापकीय संचालक/संचालक आणि कंपनी अधिकारी |
| ३. भागीदार संस्था : | भागीदार |
| ४. सहकारी संस्था : | ठरावानुसार प्राधिकृत केलेली व्यक्ती (ठराव जोडावा) |

९. दरदर्शक दरपत्रक उघडताना संस्थेचे जे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत व उपस्थिती रजिस्टरवर सही करणार आहेत. अशा प्रतिनिधीजवळ त्यांनी संस्थाप्रमुखासमोर स्वाक्षरी केलेले संस्थेचे मूळ अधिकारपत्र असणे

आवश्यक आहे. अन्यथा त्यांना उपस्थित राहता येणार नाही. संस्थाप्रमुखांना स्वतःच्या उपस्थितीसाठी अधिकारपत्राची गरज नाही. दरपत्रक धारकास/ दरपत्रक धारकाच्या एकाच प्रतिनिधीस उपस्थित राहता येईल.

१०. दरपत्रक उघडताना ठेकेदार/प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास नियमानुसार पात्र असणाऱ्या दरदर्शक दरपत्रक उघडण्यात येतील. याबाबतची कोणतीही लेखी/तोंडी तक्रार नोंदवून घेतली जाणार नाही.

११. देयकाची रक्कम फक्त धनादेशाव्दारेच अदा करण्यात येईल व त्यातून आयकर कायद्यातील तरतूदीनुसार उद्‌गमकर (आयकर) कपात केली जाईल.

१२. कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरविण्यासाठी संबंधितांची शैक्षणिक अर्हता.

अ) शैक्षणिक अर्हता

१. लिपीक/डाटा एन्ट्री ऑपरेटर

१. किमान १२ वी उत्तीर्ण

२. संगणकावर किमान इंग्रजी – ४० व मराठी -३० शब्द/प्रतिमिनीट टंकलेखन क्षमता

३. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा बोलता/वाचता/लिहिता येणे आवश्यक

करार कालावधीत ठेकेदाराने सेवा नियंत्रणासाठी सुपरवायझर नेमणे बंधनकारक असून त्याला वेळोवेळी आवश्कतेनुसार देण्यात येतील. त्याला दिलेल्या लेखी/तोंडी सूचनाचे पालन करणे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१३. (अ) कराराच्या कालावधीत कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवताना त्यांच्या हलगर्जीपणामुळे कार्यालयाचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदारास करावी लागेल किंवा मासिक देयकातून (बिल-इन-हँड) वसूल करण्याचे अधिकार परिषदेच्या सक्षम अधिकाऱ्यास (संचालक) राहतील. यासाठी ठेकेदारास परिषदेकडे **रुपये ८५००/- (अक्षरी रुपये आठ हजार पाचशे फक्त)** रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेची पुणे शाखेतील **संपादक, जीवन शिक्षण पुणे** या नावाने काढलेली मुदत ठेव सुरक्षा ठेव म्हणून ठेवावी लागेल.

(ब) ज्या ठेकेदाराचे दर मान्य केले जातीत त्याच ठेकेदाराने सेवा कालावधी पूर्ण होईपर्यंत मनुष्यबळ पुरविणे बंधनकारक आहे. त्या ठेकेदाराने त्याच्या स्वीकारलेल्या दराने काम करण्यास कालावधी पूर्ण होण्यापूर्वी असमर्थता दर्शवल्यास किंवा त्या कालावधीत अटी/शर्तीनुसार ठेकेदार काम करण्यातस असमर्थ ठरल्यास उर्वरित काम दुसऱ्या ठेकेदाराकडून करुन घेऊन झालेल्या सर्व खर्चाची रक्कम ठेकेदाराच्या सुरक्षा ठेव रक्कमेतून/देयकातून वसूल केली जाईल आणि/किंवा ही सुरक्षा ठेव जप्त केली जाईल.

१४. आवश्यक तेवढेच मनुष्यबळ वापरुन नेमून दिलेल कामकाज पूर्ण करुन घेणे आवश्यक आहे. अनावश्यक वापर/गैरवापर टाळणे आवश्यक राहील. तसे निदर्शनास आल्यास त्यास ठेकेदार जबाबदार राहील. निवड झालेल्या ठेकेदाराने नेमून दिलेल्या मनुष्यबळाने दैनंदिन कामे दररोज व वेळीच करणे आवश्यक आहे.

१५. दरपत्रक स्वीकृतीचे पत्र ठेकेदारास पोचल्यानंतर आठ दिवसांच्या आत ठेकेदारास परिषदेशी करार करावा लागेल. तसे केल्यास ठेकेदाराची निवड रद्द केली जाईल व त्याची बयाणा रक्कम जप्त केली जाईल.

१६. रोजंदारी कर्मचारी यांचे कामावर दररोज योग्य ते नियंत्रण राहणार आहे. रोजंदारी कर्मचारी यांना नेमून दिलेली काम वेळच्यावेळी व योग्य पध्दतीने होतात किंवा नाही याची पाहणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतील अधिकाऱ्यांमार्फत/कर्मचाऱ्यांमार्फत केली जाईल. सदर कामे व्यवस्थित न झाल्यास ठेकेदाराकडून दंडात्मक वसूली म्हणून रक्कम **रुपये १००/-** प्रतिदिन वसूल केली जाईल.

१७. कार्यालयाच्या परिसराच्या जवळपासच्या (अंदाजित २ किमी) परिसरातील लोकांची सदर कामासाठी नियुक्ती करण्यात येऊ नये.

१८. ठेकेदाराने कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवताना कामाचे स्वरुप, त्यांची शैक्षणिक पात्रता, पुरवायची सेवा, सेवेचा कालावधी यांचा सर्वांगीण विचार करुन निविदेतील दर रक्कमेत (पूर्णांकात) नमूद करावे. कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी यांचा मोबदला त्यांच्या कामावरील उपस्थितीच्या दिवसांइतका ठेकेदारास राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून अदा केला जाईल. त्याप्रमाणे किमान वेतन कायद्यानुसार रोजंदारी कर्मचारी यांना वेतन देणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

१९. ठेकेदारामार्फत सेवा देण्यासाठी नेमण्यात आलेल्या व्यक्तींची कोणतीही जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेवर राहणार नाही. तसेच सदर व्यक्तींना प्रचलित कामगार विषयक नियम लागू करुन त्याचप्रमाणे कार्यवाही करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. सदरहू कामाची सेवा तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे संबंधितांना ग्रॅच्युईटी व बोनस अदा केला जाणार नाही. ठेक्याच्या कालावधीत ठेकेदाराच्या कामगारांसंबंधित कुठल्याही कामगार कायद्याखाली काहीही देणे निघाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदारी ठेकेदारावर राहील.

२०. ठेकेदाराने कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरवण्यात येणाऱ्या व्यक्तींची नावे, फोटो असलेले ओळखपत्र त्याच्या सही शिक्क्यानिशी प्रमाणित करुन त्यांच्याकडे द्यावे. कार्यालयात सेवा देणाऱ्या व्यक्तींनी हे ओळखपत्र पोषाखावर दिसेल अशा पध्दतीने धारण करावे.

२१. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या कामासाठी ठेकेदाराने नेमलेल्या कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवण्यात येणाऱ्या व्यक्तींच्या शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र, निवासस्थानाचा पुरावा यांच्या साक्षांकित प्रती तसेच त्यांच्या सहयांसह राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे द्यावी. परिषदेच्या कामासाठी आवश्यक असणारा कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक स्वतंत्रपणे देण्याची व्यवस्था करावी. तसेच नेमणूक करणाऱ्या व्यक्ती गुन्हेगारी प्रवृत्तीच्या नाहीत याची खातरजमा करावी.

२२. कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींची हजेरी व त्यांचे रजिस्टर ठेकेदार ठेवतील. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेवर त्याची जबाबदारी राहणार नाही. कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींनी रोजंदारीबाबत अथवा इतर बाबतची तक्रार ठेकेदाराकडे करावयाची आहे. ठेकेदार हे मंडळाचे एजंट अथवा नोकर नाहीत. उपरोक्त सेवांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींच्या तक्रारीचे निवारण ठेकेदाराने करावे. कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींच्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारीस राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद जबाबदार राहणार नाही.

२३. कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींकडून ठेकेदाराने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या नावे लेखी हमीपत्र (विहित नमुना परिषदेमार्फत ठेकेदारास पुरवण्यात येईल) ते सादर करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच रोजंदारीबद्दल अथवा इतरबाबतची तक्रार कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींनी ठेकेदाराकडे करावयाची आहे. ठेकेदार हे मंडळाचे एजंट

अथवा नोकर नाहीत. कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तीच्या तक्रारींचे निवारण ठेकेदाराकडे करावयाचे आहे.

२४. ठेकेदारामार्फत नेमलेल्या व्यक्ती एखादे दिवशी कामावर येणार नसल्यास ठेकेदार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेस एक दिवस अगोदर त्याची लेखी कल्पना देतील व त्याऐवजी पर्यायी व्यवस्था करतील. अशा वेळी ठेकेदाराने पर्यायी व्यवस्था न केल्यास व प्राधिकरणाने पर्यायी व्यवस्था इतर ठेकेदारामार्फत केल्यास त्यासाठी होणारा खर्च व प्रतिदिन रुपये १००/- दंड देण्यास पहिला ठेकेदाराच पूर्णपणे जबाबदार राहील. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२५. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व ठेकेदार यांच्यामध्ये ठरावीक कालवधीसाठीचा करार हा करार (कॉन्ट्रक्ट) आहे. कराराची मुदत संपताच हा करार व त्याच्या अटी संपल्या आहेत असे समजण्यात येऊन तो करार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेस बंधनकारक राहणार नाही.

२६. ठेकेदाराबरोबर केलेल्या कराराच्या कालावधीमध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास मान्य दरानुसार अदा करण्यात येणाऱ्याच देयकाच्या मासिक रक्कमेतून नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईपोटीची रक्कम वजा करुन बाकी रक्कम ठेकेदारास देण्यात येईल.

२७. ठेकेदाराने कराराच्या कालावधीमध्ये अटींचे पालन न केल्यास पर्यायी व्यवस्थेच्या खर्चाची, नेमून देण्यात आलेल्या दैनंदिन कामकाजात हलगर्जीपणा केल्यास तसेच परिषदेच्या नुकसान भरपाईची जबाबदारी ठेकेदारावर राहील व ते दंडात्मक कारवाईपोटीची रक्कम वजा करुन बाकी रक्कम ठेकेदाराला देण्यात येईल.

२८. ठेकेदारास खालील बाबींविषयी कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींकडून घेतलेली लेखी प्रतिज्ञापत्रे/हमीपत्रे इ. परिषदेस मूळ प्रतीत अथवा साक्षांकित प्रतीत द्यावी लागतील, त्याची पूर्तता वेळोवेळी करावी लागेल.

- संबंधित ठेकेदाराने कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींना कामावर असताना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद कार्यालयाच्या प्रसारमाध्यम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या योग्य त्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.
- ठेकेदाराच्या कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींनी कार्यालय परिसरात कोणतेही असभ्य/अकार्यालयीन वर्तन करु नये. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या परिसरात पान/गुटखा/तंबाखू खाऊन थुंकू नये. मद्यपान करु नये. संबंधितांकडून असे वर्तन आढळल्यास ठेकेदार जबाबदार धरण्यात येऊन त्याची नुकसान भरपाई त्यांचे देयकांतून वसूल करण्यात येईल.
- करार कालावधीत सेवा देण्यासाठी ठेकेदारांनी नेमलेल्या व्यक्तींची जबाबदारी पूर्णपणे ठेकेदाराची असल्याने करार कालावधी संपल्यानंतर किंवा करार रद्द केल्यानंतर सदर व्यक्तीचा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेशी कोणताही संबंध राहणार नाही तसेच परिषदेतील नोकरीसाठी ते हक्क सांगू शकणार नाहीत.

- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या कामाच्या वेळेत ठेकेदाराच्या कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींकडून परिषदेचे नुकसान झाल्यास अथवा त्यांस इजा, दुखापत झाल्यास, मृत्यू आल्यास त्याच्या भरपाईची संपूर्ण जबाबदारी ही ठेकेदाराची असेल. त्यास परिषद जबाबदार राहणार नाही. तसेच सदर बाबत आवश्यक त्या कायदेशीर तरतूदी (विमा सरंक्षण इत्यादी) ठेकेदाराला पाळाव्या लागतील.
- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या कामासाठी ठेकेदारांमार्फत कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत नेमलेल्या व्यक्तींवर सोपवलेले काम त्या योग्य रीतीने व परिषदेच्या अपेक्षेप्रमाणे पार पाडतात की नाही हे परिषद ठरवेल व ते काम योग्य रीतीने पार पाडत नाही, असे नजरेस आल्यास त्यांची सेवा रद्दबादल ठरवण्याचा संपूर्ण अधिकार परिषदेला राहील.
- कराराप्रमाणे सेवा संपल्यावर अशा प्रकारची सेवा पुन्हा नवीन करारानुसार करण्यासाठी पूर्वीच्याच ठेकेदाराबरोबर करार झाल्यास व ठेकेदाराने पूर्वीच्या करारानुसार पूर्वीच्या कालावधीत कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत काम केलेल्या व्यक्तींच्या पुन्हा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या कामावर लावल्यास ठेकेदाराला अथवा उपरोक्त सेवांतर्गत पुरवण्यात येणाऱ्या व्यक्तींना पूर्वीच्या करारानुसार केलेल्या कामासंबंधी परिषदेच्या विरुध्द कसलाही हक्क/अधिकार/प्राधान्य निर्माण होणार नाही व सदर कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत येणारी व्यक्ती ही परिषदेच्या सेवेत होती व आहे म्हणून ही अखंड सेवा झाली, असे त्यांना म्हणता येणार नाही व तसा कोणताही हक्क/अधिकार/दावा ठेकेदार अथवा त्याच्या कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या विरुध्द करता येणार नाही.
- कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्ती ठेकेदारामार्फत नेमलेली असल्यामुळे, सेवा सलगतेचा (रिकूटमेंट), तात्पुरते काढल्याचा व पुन्हा कामावर घेण्याचा कसलाही हक्क, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेविरुध्द लावण्याचा व पुन्हा कामावर घेण्याचा कसलाही हक्क, दावा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद विरुध्द लावण्याचा कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींस अधिकार राहणार नाही.
- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेत कायम आस्थापनेवर विविध पदांकरिता जागा रिकाम्या असल्यास त्या भरल्या नाहीत, म्हणून करारानुसार ठेकेदाराने कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत नेमलेल्या व्यक्तींचा सदर जागांवर कसलाही कायदेशीर हक्क, अधिकार नव्हता व राहणार नाही.
- करारानुसार ठेकेदारामार्फत कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत नेमलेली व्यक्तीं प्राधिकरणाचे तात्पुरते, कायमस्वरुपी अथवा कसल्याही प्रकारचे नोकर (वर्कर एम्प्लॉजी) नव्हते व असणार नाहीत.
- या ठेक्याचा कामाचा आदेश मिळाल्यानंतर ठेकेदार १ महिन्याचे आत कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट १९७० प्रमाणे लायसेन्स मिळवून त्याची एक प्रत मंडळास देईल.

२९. कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवल्याबाबतचे देयक दरमहा अदा केले जाईल. ठेकेदारामार्फत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेस नव्याने पुरवलेल्या व्यक्तींची उपस्थिती तीन दिवसापेक्षा जास्त असल्यासच त्यांचा मोबदला देय राहील. तीन दिवस किंवा यापूर्वी काम सोडून गेलेल्या

व्यक्तींचा मोबदला ठेकेदारास अदा करण्यात घेणार नाही.  या बाबींची माहिती ठेकेदाराने कर्मचारी नेमण्यापूर्वीच संबंधितास द्यावी.  ठेकेदाराने कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या व्यक्तींनी त्यांचा मोबदला वेळेवर (दरमहाच्या १० तारखेपर्यंत) देण्याची जबाबदारी ठेकेदाराची असून त्याबाबतची कुठलीही लेखी/ तोंडी तक्रार परिषद स्वीकारणार नाही. ठेकेदारीवरील मनुष्यबळास दरमहाच्या १० तारखेपर्यंत वेतनाची अदायगी न केल्यास तेवढया दिवसांची दंडात्मक कार्यवाही म्हणून प्रशासकीय खर्चाच्या ५० टक्के रक्कम कुशल-अकुशल कामगार पुरवठा अंतर्गत रोजंदारी कर्मचारी पुरवठा सेवेच्या देयकातून कपात करण्यात येईल.  याबाबतची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.  तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेस पुरविलेल्या रोजंदारी पध्दतीने पुरविलेल्या सेवेचे देयक दरमहाच्या १ तारखेला परिषदेकडे सादर करणे बंधनकारक राहील.  सेवा कालवधीत कामावर असल्याच्या हजेरीपत्राची मूळ प्रत, मागील महिन्याची भविष्य निर्वाह निधीची व राज्य कामगार विमा योजनेंतर्गत भरलेली चलने कर्मचारीनिहाय भरलेल्या रक्कमांचा तपशील, मोबदला मिळाल्याबाबतची व्यक्तीची स्वाक्षरी असलेले वेतन रजिस्टर व देण्यात आलेला कामाचा आदेश इत्यादीची प्रमाणित केलेल्या छायाप्रती दरमहाच्या देयकासोबत जोडणे बंधनकारक आहे.

३०. या दरपत्रकामध्ये स्वतःच्या कोणत्याही अटी नमूद करु नये.

३१. दरपत्रकातील तसेच परिषदेने वेळोवेळी केलेल्या सूचना कराराच्या कालावधीत ठेकेदारावर बंधनकारक राहतील.

३२. कोणत्याही कारणास्तव दरपत्रक (अंशतः/पूर्णतः) स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे हक्क संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ३० यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

३३. या दरपत्रकासाठी पुणे येथील न्यायालयीन कार्यकक्षा राहील.

३४. उपरोक्त सर्व कागदपत्रे (नमुना ‘ब’ वगळून) तांत्रिक लिफाफा क्रमांक १ सोबत सादर करण्यात यावीत.

३५. नमुना ‘ब’ (दरदर्शक) हा स्वतंत्रपणे लिफाफा क्रमांक २ मध्ये सादर करण्यात यावा.

ठिकाण :                                                            दरपत्रक धारकाचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :                                                            (संस्थेच्या शिक्क्यासह)